केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता लेखाशिर्ष ४४०२ २६२७ खाली निधी वितरीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन.**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१७ / प्र. क्र.२३ / कार्यासन.६**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: २१/०३/२०१८

वाचा -

१) वि. वि, शासन परिपत्रक, क्रमांकः अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७.
२) वि. वि, शासन परिपत्रक, क्रमांकः अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४ / अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७.व ०६.०२.२०१८.
३) मृद व जलसंधारण विभागाची नस्ती क्र.प्रकृयो- २०१७ / प्र.क्र.१०० / जल-०८.

**शासन निर्णय :-**

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत मागणी क्र.टी-६, ४४०२, मृद व जल संधारणावरील भांडवली खर्च ,पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ७९६- जनजाति क्षेत्र उपयोजना, (०१) (०६) प्रधानमंत्री कृषि सिंचना योजना - एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम मृद संधारणाद्वारे भू-विकास, ( राज्य हिस्सा ४० टक्के ) ४४०२ २६२७, ५३- मोठी बांधकामे या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता रु.५०० लाख इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

२. केंद्र शासनाने प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता प्राप्त तरतुदीस अनुसरुन . मृद व जलसंधारण विभागाच्या वाचा क्र. ३ येथील प्रस्तावान्वये अनुसुचित जमाती प्रवर्गाकरीता मागणी क्र.टी-६, ४४०२, मृद व जल संधारणावरील भांडवली खर्च ,पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ७९६- जनजाति क्षेत्र उपयोजना, (०१) (०६) प्रधानमंत्री कृषि सिंचना योजना - एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम मृद संधारणाद्वारे भू-विकास, ( राज्य हिस्सा ४० टक्के ) ४४०२ २६२७, ५३- मोठी बांधकामे या लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पित निधीपैकी **रु. ५५.१३१ लक्ष ( अक्षरी रुपये पच्चांवन्न लक्ष तेरा हजार शंभर फक्त** ) इतका निधी प्रशासकीय विभाग / नियंत्रक अधिकारी म्हणून सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS ) वितरीत करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

३. उपरोक्त प्रमाणे वितरीत केलेला निधी या प्रकल्पाच्या मंजूर प्रशासकीय मान्यता रकमेच्या मर्यादेत खर्च करण्याची तसेच त्यानुषंगाने निधी खर्च करण्यासंबंधीच्या नियमांचे पालन करण्याची दक्षता प्रशासकीय प्रमुख तथा नियंत्रक अधिकारी यांनी घ्यावी.

४. नियंत्रण अधिकारी आणि विभागप्रमुख यांनी ही तरतुद शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.टिएसपी-१०८६/ ८७१०/ प्र.क्र.३१/का.५ दिनांक ९.३.१९९० अन्वये निश्चित केलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्र व क्षेत्राबाहेरील मान्य योजनांवर खर्च होतील याची दक्षता घ्यावी. तसेच या तरतूदी खर्च करतांना शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.टिएसपी-२००३/प्र.क्र.१०१/का-६, दिनांक २६ जुलै, २००४ व टिएसपी-२००५/प्र.क्र.५९/का-६, दिनांक १० नोव्हेंबर, २००५ मधील अटींचे कटाक्षाने पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. तसेच प्रस्तुत शासन निर्णयाद्वारे वितरित करण्यात येत असलेल्या तरतूदी मासिक खर्च विवरणपत्राप्रमाणे खर्च करण्याची दक्षता नियंत्रक अधिका-यांनी घ्यावी.

५. प्रकरणी नियंत्रण अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय / उपलेखाशिर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास व मृद व जलसंधारण विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

६. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर संनियंत्रण ठेवता येईल.

७. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लाभार्थ्यांकरिता व आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी लाभार्थ्यांकरिताच खर्च करण्यात यावी.

८. नियंत्रण अधिका-यांनी वित्त विभागाच्या दि.०१-०४-२०१७ व दि. १८-०४-२०१७ दि.३०.०६.२०१७ व ०६.०२.२०१८ रोजीच्या परिपत्रकातील अटी व शर्तीची पुर्तता करण्याची दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201803201508086224 असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2018.03.23 12:59:19 +05'30'

**रविंद्र दि. औटे**
अवर सचिव, आदिवासी विकास विभाग.

**प्रत,**

१. सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई

२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.

३. सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग.

४. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.

५. महालेखापाल (लेखापरिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

६. विभागीय आयुक्त, मुंबई / नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती/ पुणे.

७. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.

८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

०९. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

१०. मृद  व जलसंधारण विभाग, जल-०८, मंत्रालय, मुंबई.

११. कार्यासन अधिकारी,  कार्यासन- २  / कार्यासन-१७,  आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१२. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.